दैनिक
# समर्थ राजयोग
https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com
वैभव विवेक स्वामी
सपादक
राजमान्य, राजशक्ती
SAMARTH RAJYOG
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.
बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी वर्ष – ५ वे अंक –१०६ रविवार,दि.२२ डिसेंबर २०२४ 98 22 62 85 21 आरएनआय –एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रू । पाने ४
Beed Daily Marathi Year-5th Issue-106 Sunday, Dt.22 December 2024 98 22 62 85 21 RNI - MAHMAR/2020/79801 Price 3 Rs. Pages 4

## ओ दादा धनंजय मुंडेंना मंत्रिमंडळातून काढा;घोषणाबाजी

मस्साजोग /प्रतिनिधी

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज मस्साजोगमध्ये जाऊन संतोष देशमुख यांच्या कुटुंबीयांचे सांत्वन केले. अजित पवार मस्साजोगमध्ये आल्यानंतर ग्रामस्थांनी धनंजय मुंडेंच्या विरोधात घोषणाबाजी केली. ओ दादा धनंजय मुंडेंना मंत्रिमंडळातून काढून टाका, त्याने बीड जिल्हा नासवून टाकला, अशी मागणी यावेळी मस्साजोगच्या ग्रामस्थांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे केली.

# देवेंद्र फडणवीस सरकारमध्ये मंत्र्यांचे खातेवाटप जाहीर



## देवेंद्र फडणवीसांकडे गृह, अजित पवारांकडे अर्थ तर एकनाथ शिंदेंकडे नगर विकास खाते



मंत्रिमंडळाचा विस्तार झाल्यानंतर खाते वाटप कधी होणार, अशी चर्चा सुरू होती. अशात सरकारच्या वतीने आज रात्री खातेवाटप करण्यात आले असून गृह खाते हे देवेंद्र फडणवीस यांच्याकडेच कायम राहिले आहे. तर अर्थ खाते हे अजित पवारांकडे देण्यात आले आहे. गृहखात्यासाठी अडून बसलेले एकनाथ शिंदे यांच्याकडे नगर विकास खाते देण्यात आले आहे.

मंत्रिमंडळाचा विस्तार झाल्यानंतर खाते वाटप कधी होणार, अशी चर्चा सुरू होती. अशात सरकारच्या वतीने आज रात्री खातेवाटप करण्यात आले असून देवेंद्र फडणवीस यांच्याकडेच गृहमंत्रालय असणार आहे. तर अर्थ खाते हे अजित पवारांकडे देण्यात आले आहे. गृहखात्यासाठी अडून बसलेले एकनाथ शिंदे यांना नगर विकास खात्यासोबतच गृहनिर्माण खाते दिले आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गृह खात्यासोबतच ऊर्जा, कायदा व न्यायव्यवस्था, सामान्य प्रशासन आणि माहिती व प्रसारण खाते स्वत:कडेच ठेवले आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे अर्थसह उत्पादन शुल्क खात्याची जबाबदारी देण्यात आली आहे. तर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे नगर विकाससह, गृहनिर्माण, ग्रामविकास आणि सार्वजनिक बांधकाम विभागाची जबाबदारी देण्यात आली आहे.

### खाली पाहा संपूर्ण यादी

चंद्रशेखर बावनकुळे - महसूल
राधाकृष्ण विखे पाटील - जलसंधारण ( गोदावरी व कृष्णा खोरे विकास)
हसन मुश्रीफ - वैद्यकीय शिक्षण
चंद्रकांत पाटील - उच्च व तंत्रशिक्षण, संसदीय कामकाज मंत्री
गिरीश महाजन - जलसंधारण (विदर्भ, तापी, कोकण विकास), आपत्ती व्यवस्थापन
गुलाबराव पाटील - पाणीपुरवठा
गणेश नाईक - पर्यटन
दादाजी भुसे - शालेय शिक्षण
संजय राठोड - माती व पाणी परीक्षण
धनंजय मुंडे - अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण
मंगलप्रभात लोढा - कौशल्य विकास, रोजगार, उद्योग व संशोधन
उदय सामंत - उद्योग व मराठी भाषा
जयकुमार रावल - विपणन, प्रोटोकॉल
पंकजा मुंडे - पर्यावरण व वातावरण बदल, पशुसंवर्धन
अतुल सावे - ओबीसी विकास, दुग्धविकास मंत्रालय, ऊर्जा नुतनीकर
अशोक उईके - आदिवासी विकास मंत्रालय
शंभूराज देसाई - पर्यटन, खाण व स्वातंत्र्य सैनिक कल्याण मंत्रालय
आशिष शेलार - माहिती व तंत्रज्ञान
दत्तात्रय भरणे - क्रीडा व अल्पसंख्याक विकास व औकाफ मंत्रालय
अदिती तटकरे - महिला व बालविकास
शिवेंद्रराजे भोसले - सार्वजनिक बांधकाम
माणिकराव कोकाटे - कृषी
जयकुमार गोरे - ग्रामविकास, पंचायत राज

### राज्यमंत्री

माधुरी मिसाळ - सामाजिक न्याय, अल्पसंख्याक विकास व औकाफ मंत्रालय, वैद्यकीय शिक्षण
आशिष जयस्वाल - अर्थ आणि नियोजन, विधी व न्याय
मेघना बोर्डीकर - सार्वजनिक आरोग्य, कुटुंब कल्याण, पाणी पुरवठा
इंद्रनील नाईक - उच्च आणि तंत्र शिक्षण, आदिवासी विकास आणि पर्यटन
योगेश कदम - ग्रामविकास, पंचायत राज* पंकज भोयर - गृहनिर्माण






### बीडला मिळाले पर्यावरण आणि नागरी पुरवठा खाते

महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळामध्ये एकमेव बीड जिल्ह्यातून दोन कॅबिनेट मंत्री आहे बीड जिल्ह्याला पर्यावरण व वातावरण बदल पशुसंवर्धन ही महत्त्वाची खाती भाजपा नेत्या पंकजा मुंडे यांच्या रूपाने मिळाले आहेत. तर गोरगरीब सर्वसामान्य जनतेशी निगडित असलेले अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण हे महत्वाचे खाते धनंजय मुंडे यांच्या रूपाने बीड जिल्ह्याला मिळाले आहे.

### बीडचे पालकत्व पुन्हा धनंजय मुंडे यांच्याकडेच !



बीड जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणून राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षाचे नेते महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे निष्ठावंत निकटवर्तीय बीड जिल्ह्याचे भूमिपुत्र धनंजय मुंडे यांनाच मिळणार यात शंका नाही.

### पंकजा मुंडेंना मिळणार परभणीचे पालकत्व



भाजपा नेत्या पर्यावरण मंत्री पंकजा गोपीनाथ मुंडे यांना परभणी जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणून जबाबदारी मिळेल अशी शक्यता आहे.

## संपादकीय

# प्रकाशाचे सांध्यपर्व!

भारतीय क्रिकेट संघ जेव्हा ऑस्ट्रेलियासारख्या कठीण दौऱ्यावर निघाला, तेव्हा त्यातील चार खेळाडू कारकीर्दीचा संधिकाल सुरू असलेले होते, आहेत. न्यूझीलंडविरुद्ध घरच्या मैदानावर सपाटून मार खाऊन ऑस्ट्रेलियात चाललेल्या या संघाकडून फारशी अपेक्षा नसतानाही या चमूने पहिला सामना जिंकला खरा; पण दुसऱ्या सामन्यातील वाताहत आणि तिसऱ्यात याच मार्गावरून वाटचाल सुरू असताना पाऊस मदतीला आल्याने वाचलेली इभ्रत पाहता, आत्ताचा संघ या दौऱ्यानंतर मोठ्या स्थित्यंतरातून जाणार हे स्पष्ट आहे. त्या स्थित्यंतरातील एक थोडा अनपेक्षित आणि चुटपुट लावून गेलेली 'कलाटणी' म्हणजे फिरकी गोलंदाज रविचंद्रन अश्विनची निवृत्ती. अश्विनचे वय पाहता खरे तर त्याची निवृत्ती अकाली वगैरे नाही. कोणताही चांगला आंतरराष्ट्रीय क्रिकेटपटू वयाच्या विशीत आंतरराष्ट्रीय कारकीर्दीला सुरुवात करून तिशीच्या उत्तरार्धात निवृत्त होतो, तसा अश्विनही १४ वर्षे आंतरराष्ट्रीय क्रिकेट खेळून ३८ व्या वर्षी निवृत्त झाला. निवृत्तीचा निर्णय वैयक्तिक आहे, असे तो सांगत असला, तरी भारतीय क्रिकेटमध्ये जे जे काही होते, ते कधीच वैयक्तिक राहात नाही. अश्विनच्या निर्णयालाही ते लागू होते. सामने जिंकून दिलेल्या क्रिकेटपटूला निवृत्त होताना चांगली मानवंदना मिळायला हवी होती, असे सूर उमटले, ते त्यामुळेच. 'मी त्याला अशा प्रकारे निवृत्त होऊ दिले नसते,' असे कपिलदेव यांनी बोलूनही दाखवले. पण, हा केवळ त्याच्याच निवृत्तीचा मुद्दा नाही, तर भरीव कामगिरी केलेल्या खेळाडूंच्या कारकीर्दीच्या संधिकालाबाबत भारतीय क्रिकेटने अधिक समंजस असण्याची गरज आहे, हा यातील महत्त्वाचा धडा आहे.

या धड्याकडे वळण्यापूर्वी अश्विनने जो वस्तुपाठ घालून दिला, त्याबाबत. अश्विन हा काही भारतीय क्रिकेटमधील अतिशय लोकप्रिय खेळाडूंचे जे परिमाण आहे, त्यात बसणारा नाही. नैसर्गिक उंची सोडल्यास व्यक्तिमत्त्वात वेगळा रुबाबदारपणा आहे, असेही नाही. त्याला संघात घेऊनही अंतिम ११ खेळाडूंत खेळवले नाही, म्हणून खूप मोठ्या चर्चा झडल्या किंवा त्यामुळेच कसा सामन्याच्या निकालावर परिणाम झाला, असेही अपवाद वगळता कधी म्हटले गेलेले नाही. तो काही जगातील अत्यंत अभिजात ऑफस्पिनर किंवा त्यांचा किमान वारसा चालवणारा वगैरेही नाही. पण, तरी त्याचे क्रिकेटमध्ये वेगळे स्थान आहे. किंबहुना हे सगळे नाही, तरी त्याच्या कामगिरीची क्रिकेटच्या इतिहासाला दखल घ्यावीच लागेल, हे त्याचे वैशिष्ट्य. एरवी १०६ कसोटी सामन्यांत ५३७ बळी घेणे हे गोलंदाजाकडे कला आणि कौशल्य दोन्ही असल्याशिवाय साध्य होत नाही. अश्विनची खासियत अशी की, त्याने कारकीर्दीच्या प्रत्येक महत्त्वाच्या टप्प्यावर वैयक्तिक आणि सांघिक पातळीवर समस्या निवारकाची भूमिका बजावली आहे. तो अजून पुरता कायमचा फिरकी गोलंदाजही झालेला नसताना - भारताच्या १७ वर्षांखालील संघाच्या शिबिरात असताना त्याला पहिली समस्या कोणती भेडसावली असेल, तर भाषेची. त्यावर त्याने इतर कशाहीपेक्षा व्यावहारिक उत्तर शोधले, ते हिंदीची खासगी शिकवणी लावून. समस्या या सोडविण्यासाठी असतात, याची खूणगाठ मनाशी पक्की बांधून तो आपल्या गोलंदाजीबाबतही असेच प्रयोग करत राहिला. 'तू ऑफस्पिनची अभिजातता जप, जास्त प्रयोग करू नकोस,' असा कधी आगंतुक सल्ला किंवा हेटाळणीसुद्धा त्याच्या वाट्याला आलीच नाही, असे नाही. त्याने यावर हटकून स्वतंत्र उपाय शोधले, हा त्याचा धाडसीपणा. समोर खेळणाऱ्या फलंदाजाला आपण टाकत असलेल्या प्रत्येक चेंडूवर नवे प्रश्न विचारायचे, हे त्याचे यावरचे उत्तर! कधी टप्पा बदलून, कधी गोलंदाजीची धाव कमी-जास्त करून, कधी 'बोलिंग क्रीझ'चा अतरंगी वापर करून आणि अनेकदा 'कॅरम बॉल'च्याच विविध क्लृप्त्या अजमावून फलंदाजाला कायम बुचकळ्यात पाडणे हा त्याचा आवडता छंद. प्रयोगाला अश्विन कधी घाबरला नाही आणि त्यासाठी सराव जाळ्यात वाट्टेल तेवढे कष्ट घ्यायला तो कमीही पडला नाही. भारताबाहेरच्या खेळपट्ट्या फिरकीला पोषक नसतानाही त्याने यश मिळवले, ते या जोरावर. अर्थात, तेथे कदाचित आपल्या गोलंदाजीची फारशी करामत चालणार नाही, ही समस्या असू शकते म्हटल्यावर त्याने फलंदाजी मजबूत करण्याचा उपायही शोधलाच.

# सामाजिक उपक्रम ; दिव्यांग विद्यार्थ्यांसोबत बाळराजे पवार यांचा वाढदिवस साजरा

**गेवराई : स्वच्छ गेवराई, सुंदर गेवराई चे जनक लोकप्रिय युगपुरुष बाळराजे दादा पवार यांच्या वाढदिवसानिमित्त अनावश्यक खर्चाला फाटा देवून सौ.गीताभाभी बाळराजे पवार यांच्या उपस्थितीत शनिवार दि.२१ डिसेंबर रोजी शहरातील ताकडगाव रोड, गेवराई येथील दिव्यांग शाळेत एलसीडी टीव्ही भेट देत विद्यार्थ्यांना फळ वाटप करुन सामाजिक उपक्रमांनी वाढदिवस साजरा करण्यात आला.**



गेवराई शहरातील मुकबधीर व मतिमंद निवासी विद्यालय येथे बाळराजे पवार मित्र मंडळाच्या पुढाकाराने अनावश्यक खर्चाला फाटा देत बाळराजे दादा पवार यांचा दिव्यांगांच्या निवासी शाळेत एलसीडी टीव्ही सप्रेम भेट देत विद्यार्थ्यांना फळ वाटप करुन सामाजिक उपक्रमाने वाढदिवस साजरा करण्यात आला. यावेळी सौ.भाग्यश्री लक्ष्मण पवार, सौ. रत्नमाला मोटे, नितीन शेटे, राम पाटेकर, दिनेश भंडारी, इम्रान पठाण, आसिफ शेख, राम सोलट, दत्ता गिरी, सोहेल शेख, पवन दहिवाळ सह शाळेतील शिक्षक , शिक्षकेत्तर कर्मचारी व दिव्यांग विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी संस्थेच्या वतीने संयोजकांचे आभारपत्र देऊन आभार व्यक्त करण्यात आले.

# शरद पवारांनंतर अजितदादांनी घेतली संतोष देशमुखांच्या कुटुंबियांची भेट



मी स्वत: लक्ष देईल, पवारांचा शब्दसंतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणातील तपासात कुठल्याही परिस्थितीत राजकीय हस्तक्षेप होणार नाही. या प्रकरणाची संपूर्ण चौकशी होऊन दोषींना फाशीची शिक्षा होईल. या मागील मास्टरमाइंड जो कुणी असेल, त्याला सोडणार नाही, असे आश्वासन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी ग्रामस्थांशी बोलताना दिले. या प्रकरणात वेगवेगळ्या प्रकारच्या चर्चा सुरू आहेत. त्यातून कायदा सुव्यवस्थेचे प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या संपूर्ण प्रकरणावर सरकारचे आम्हा सर्वांचे बारकाईने लक्ष आहे. या प्रकरणाचा संपूर्ण तपास होईपर्यंत मी व्यक्तीश: त्याठिकाणी लक्ष देईन आणि कुणालाही सोडले जाणार नाही, अशी खात्री अजित पवार यांनी मस्साजोग ग्रामस्थांना दिली.

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर संपूर्ण राज्य हादरले होते. या घटनेला 13 दिवस उलटून गेले आहेत. आज संतोष देशमुख यांचे तेराव्याचा कार्यक्रम होता.त्याअनुषंगाने सकाळी शरद पवार यांनी मस्साजोगमध्ये जाऊन कुटुंबियांशी संवाद साधला.तोच सायंकाळी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी देखील बीड जिल्ह्यातील मस्साजोगमध्ये दाखल झाले आहेत. त्यांनी संतोष देशमुख यांच्या कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले. तसेच संतोष देशमुख यांच्या हत्येमागील मास्टरमाइंडला सोडणार नाही, असे आश्वासन त्यांनी कुटुंबियांसह गावकऱ्यांना दिली.चौकट काय म्हणाले मस्साजोग गावात अजित पवार?अधिवेशन संपताच उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज संतोष देशमुख यांच्या कुटुंबियांची भेट घेत सांत्वन केले. यावेळी त्यांनी देशमुख कुटुंबियांशी चर्चा करून त्यांना धीर देण्याचा प्रयत्न केला.ही घटना फार वेदनादायी, माणुसकीला काळीमा फासणारी आहे. संतोष यांच्या हत्येची न्यायालयामार्फत तसेच कुणाचाही दबाव येऊ नये, यासाठी आयजी लेव्हलच्या वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांमार्फतही चौकशी करत आहोत, असे अजित पवार यांनी देशमुख कुटुंबियांना सांगितले.



## बाळराजे पवार यांच्या वाढदिवसानिमित्त १०१ ऊसतोड कामगारांना वाटप

गेवराई /प्रतिनिधी

तालुक्याचे युवा नेते बाळराजे दादा पवार यांच्या वाढदिवसानिमित्त १०१ ऊसतोड कामगारांना युवा नेते शिवराज दादा पवार यांच्या हस्ते यांच्या हस्ते वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाचे आयोजन बंजारा क्रांती दलाचे जिल्हाध्यक्ष लक्ष्मण चव्हाण भाजपा युवा नेते कृष्णाजी ढाकणे रमेश राठोड परमेश्वर राठोड लक्ष्मण मुंडे यांनी केले होते याप्रसंगी उपस्थित शेख निजामभाई समाधान मस्के कृष्णाजी पाटोळे दाऊद भाई पठाण दादासाहेब राठोड महेश सौंदरमल फाहद चाऊस प्रकाश पवार सुरेश राठोड आकाश पवार बबनराव राठोड व ऊसतोड कामगार आदी उपस्थित होते.

जा.क्र./न.प./अंबड/नामांतर/२०२४/८४४
कार्यालय नगर परिषद,अंबड
दिनांक :- १७/१२/२०२४

अर्जदार श्री./ :- शंकर भाऊसाहेब तार्डे रा.जामखेड ता.अंबड
प्रकरण :- सर्व्हे नं.४५१(भाग) प्लॉट नंबर ४ चे हस्तांतरण करणे बाबत.

सर्व जनतेस या जाहिनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प.मालमत्ता घर क्र. ( प्लॉट नं.४ ) दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला -----------येथे इमारतीचे/ जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतो ज्याची चतु:सिमा खालील प्रमाणे आहे.जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासून (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा.नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

चर्तु:सिमा
पुर्व :- प्लॉट नंबर ५
पश्चिम :-०९ मीटर रुंदीचा कॉलनी अंतर्गत रस्ता
दक्षिण :- ०९ मीटर रुंदीचा कॉलनी अंतर्गत रस्ता
उत्तर :- प्लॉट नंबर १

**मुख्याधिकारी**
**नगर परिषद, अंबड**



## उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे लातूर विमानतळावर आगमन व प्रयाण

लातूर : प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील मस्साजोग येथे जाण्यासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे लातूर विमानतळावर आगमन झाले. यावेळी त्यांच्यासोबत आमदार विक्रम काळे, आमदार अमोल मिटकरी होते. त्यांनी लातूर विमानतळ येथून हेलिकॉप्टरने मस्साजोगकडे प्रयान केले.यावेळी विमानतळावर जिल्हा पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, प्रभारी अपर जिल्हाधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, पोलीस उपाधीक्षक गोरख दिवे, तहसीलदार सौदागर तांदळे, वस्तू व सेवा कर विभागाचे सहायक राज्यकार आयुक्त गौरीहर स्वामी यांच्यासह अधिकारी, पदाधिकारी उपस्थित होते.

# महसुल अधिकाऱ्यास तहसिल कार्यालयातील दलालाची अश्लील,जातीवाचक शिविगाळ!

माजलगाव (प्रतिनिधि)येथील तहसिल कार्यालयात हिंदु धर्मातील भील्ल जातीच्या सहाय्यक महसुल अधिकाऱ्यास तहसिल कार्यालयात विविध विभागात दलाली करणाऱ्या एका व्यक्तीने अश्लील,अशलाग्य शिविगाळ तर केलीच पण त्यांच्या जातीचा उल्लेख करुन जातीवाचक शिविगाळ केल्याची घटना घडली असुन पीडीत स.महसुल अधिकारी यांनी माजलगाव शहर पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादी नुसार त्या दलाला विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या निंदणीय घटने बाबत मिळालेल्या माहितीनुसार माजलगाव तहसिल कार्यालयात सहाय्य महसुल अधिकारी वसंत कर्मा वसावे यांनी माजलगाव शहर पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादी नुसार ते २०डिसेंबर रोजी च्या सकाळी १०:१५वा. कार्यालयातील संजय गांधी विभागात असतांना दुपारी १:४५वा.च्या सुमारास निराधार लोकांसाठी दलाल म्हणुन विविध विभागात काम करणारा प्रकरणातील आरोपी नामे विष्णु गणपत गोरे रा. सोन्नाथडी,ता.माजलगाव,जि.बीड संजय गांधी विभागात आला.त्यावेळी कार्यालयात हजर असलेले कर्मचारी अशोक वखरे(कोतवाल), अनिल गायकवाड (महसुल सहाय्यक) व बाहेरील नागरीक बाबासाहेब ज्ञानोबा आगे, महेश इचके तेथे होते आणि वसंत कर्मा वसावे हे दुसऱ्या कैबिन मध्ये कामात व्यस्त होते.त्यावेळी वसावे यांना उद्देशुन अश्लील व अशलाग्य शिविगाळ करत म्हणत होता की,निराधार महिलांची कामे व्यवस्थित करत नाहीत. यानंतर वसावे कैबिन च्या बाहेर येऊन विष्णु ला म्हणाले की,ते पण हिंदु धर्मातील भील्ल जातीचे आहेत हे विष्णु ला माहिती होते.तरी देखील तो वसंत वसावे यांना म्हणाला गोसाव्या,आदिवासी जातीच्या अशी जातीवाचक शिविगाळ करुन शासकीय कामात अडथळा आणला.अशा फिर्याद वरुन उल्लेखित नामे आरोपी विरोधात भान्यासं -२०२३चे कलम १३२,३५१ (२)सह अनु.जाती/जमाती वर अत्याचार प्रतिबंधात्मक कलम ३(१),(आर),३(१),(एस),३(२),(व्हिए)अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असुन पुढिल तपास पोनि.रा.का.सुर्यतळ करत आहेत.



नागपूर - पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे यांचे नागपूर या ठिकाणी स्वागत करताना भाजपाचे बीड जिल्हा नेते नवनाथ शिराळे पाटील, जिल्हाध्यक्ष शंकरराव देशमुख यांच्या सह प्रमुख पदाधिकारी हजर होते.



माजलगाव (प्रतिनिधी): तालुक्यातील फुले पिंपळगाव येथील गायरान जमीन धारकांना जमीन मोजणी करून देण्यात यावी,अशी मागणी अर्ज महेंद्रशामराव साळवे यांनी दिला होता.परंतु भूमिअभिलेख कार्यालयाने कोणत्याही हद्दखुणाची मोजणी केली नाही.उलट त्यांच्या अडाणीपणाचा गैरफायदा घेवून हद्दखुणा मोजणी करण्याऐवजी पोटहीश्याची मोजणी केली. दरम्यानअर्जदाराच्या मागणी नुसार मोजणी न केल्याने आंबेडकरी विचार मोर्चाच्या वतीने सय्यद सलीम यांनी शुक्रवार दि.२० रोजी आमरण उपोषणास बसले होते.सदरील जमीन मोजणी चार दिवसात करून देण्याचे लेखी आश्वासन दिल्यानंतर हे अमरण उपोषण मागे घेण्यात आले. महिंद्र श्यामराव साळवे यांनी आपल्या फुलेपिंपळगाव शिवारातील गट नं.२० गायरान जमिनीची हद्दखुणा करण्याची माजलगाव भूमी अभिलेख कार्यालयाकडे फीस भरून लेखी व तोंडी मागणी केली होती.अर्जदाराने प्रत्यक्ष भेटूनही अनेक वेळा विनंत्या केल्या होत्या. परंतु अर्जदाराच्या अज्ञानीपणाचा व निरक्षर असल्याचा गैरफायदा घेत येथील कर्मचारी अधिकाऱ्यांनी अर्जानुसार हद्दखुणाची मोजनी न करता पोटहिश्याची मोजणी केली.भूमिअभिलेख कार्यालयाच्या या टोलवाटोलवी प्रकाराबद्दल आंबेडकरी विचार मोर्चेच्या वतीने उपोषणाचा इशाराही देण्यात आला होता.

# परळीत शिवभोजन मालकाकडून जेवण मागितल्याने अपंगास अमानुष मारहाण

## अपंग प्रहार संघटनेच्या वतीने तीव्र आंदोलन करणार- शाहू डोळस

बीड (प्रतिनिधी) बीड जिल्ह्यातील परळी येथील दिव्यांगास परळी रेल्वे स्टेशन येथील शिवभोजन चालवणाऱ्या मालकाने एका दिव्यांगास जेवण मागितल्याने अमानुष मारहान केली आहे. असा धक्कादायक प्रकार परळी तालुक्यात घडला आहे. दिव्यांग व्यक्तीला मारहाण करत असताना त्या ठिकाणी उपस्थित असलेल्या व्यक्तीने हा मारहाणीचा प्रकार पाहून मध्यस्थी केली. सदरील शिवभोजन चालवणाऱ्या मालकाला कळायला पाहिजे होते की, दिव्यांग व्यक्तीने असा कोणता गुन्हा केला होता. जेवणासाठी आलेल्या दिव्यांगला छातीत लाथा मारायच्या त्याच्या जवळ कोणी नाही ह्यामुळे जर त्या कडून काही चुक झाली असती तर त्याला पोलिसांना येई पर्यंत पकडून पोलिसांच्या स्वाधीन करायला हवे होते. खाली पडून त्याच्या छातीत लाथा मारणे हे त्या शिवभोजनच्या मालका कडून दिव्यांगास अमानुष मारहान झाली तेव्हा पासून सदरील दिव्यांग कोणालाही सापडत नाही. त्याला ही पोलिसांनी शोधून काढावे. त्याचे काही बरे वाईट होऊ नये. पोलीस अधीक्षक साहेब यांनी संबंधित पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक यांचे मार्फत दिव्यांग अधिनियम 2016(92)1नुसार शिवभोजनच्या मालका विरोधात गुन्हा नोंदवून त्यांना अटक करावी तसेच जिल्हाधिकारी



साहेबांनी त्याचे लायसन रद्द करावे.अशी मागणी प्रहार अपंग क्रांती आंदोलन जिल्हा बीड च्या वतीने जिल्हा उपाध्यक्ष शाहू डोळस यांनी केली आहे.नसता 23/12/2024रोजी जिल्हाधिकारी बीड यांचे कार्यालया समोर तीव्र निदर्शने करण्यात येतील.याची सर्व स्वी जबाबदारी पोलीस प्रशासनाची राहील.

# नागपूरात मुख्यमंत्री ना .देवेंद्र फडणवीस यांचे समवेत योग शिक्षकांच्या मागण्यांबाबत चर्चा




गेवराई (प्रतिनिधी ) -नागपूर येथील विधानभवन येथे महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री ना . देवेंद्र फडणवीस यांच्याशी महाराष्ट्र योग शिक्षक संघाचे संस्थापक अध्यक्ष डॉ. मनोज निलपवार व इतर पदाधिकाऱ्यांनी योग शिक्षक मागण्यांबाबत गुरुवार दि. १९ डिसेंबर रोजी चर्चा केली.

महाराष्ट्र योग शिक्षक संघाच्या वतीने गेल्या काही वर्षापासून राज्यातील योग शिक्षक यांच्या मागण्या शासनाकडे वेळोवेळी मांडण्यात येतात. संघटनेचे संस्थापक डॉ.मनोज निलपवार यांच्या अध्यक्षतेखाली राज्य व जिल्हा कार्यकारीणीच्या पदाधिकाऱ्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन मागण्याबाबत सकारात्मक चर्चा केली . त्यांनी योग शिक्षकांच्या मागण्या विधिमंडळात मांडणार असल्याचे सांगितले तसेच योगशिक्षक हे ग्रामीण व शहरी भागात नागरिकांच्या आरोग्यसेवेचे महत्वपूर्ण कार्य करतात ,असे प्रतिपादन केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतलेल्या समितीमध्ये संघटनेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. मनोज निलपवार, संघटनेचे राज्य कार्यकारी अध्यक्ष प्रसाद कुलकर्णी,नागपूर विभागप्रमुख विनायक बारापत्रे, राज्य महासचिव अमित मिश्रा, आरोग्यवर्धिनीचे राज्य अध्यक्ष गजानन चौधरी,राज्य उपाध्यक्षा सुपर्णाताई पाल, राज्य उपाध्यक्ष लताताई होलगरे,नागपूर जिल्हा अध्यक्ष पुरुषोत्तम थोटे, महासचिव मनोहर पाल, जिल्हा कोषाध्यक्ष उषाताई हिंदारिया, जनसंपर्क अधिकारी कृणाल महाजन, योग शिक्षण समितीचे अतुल गाळेराव यांचा समावेश होता.

# संत गाडगेबांबांनी शिक्षणाचा प्रचार,प्रसार तर अंधश्रद्धेवर प्रहार केला - वसुदेव बप्पा गायकवाड



केज/ प्रतिनिधीसंत गाडगेबाबांनी आयुष्यभर किर्तन प्रवचनाच्या माध्यमातुन शिक्षणाचा प्रचार,प्रसार केला तर सातत्याने अंधश्रध्देवर प्रहार केला असे प्रतिपादन माजी प्राचार्य,जेष्ठ विचारवंत, जेष्ठ समाजसेवक, सुप्रसिद्ध वक्ते वव्याख्याते वसुदेव बप्पा गायकवाड यांनी केले.ते स्वानंद सार्वजनिक वाचनालय, आनंदगांव ता.केज.जि. बीड येथे आयोजित संत गाडगेबाबा पुण्यतिथी निमित्त आयोजित चर्चासत्र व परिसंवाद कार्यक्रमात अध्यक्षीय समारोप करताना बोलत होते.यावेळी सर्वप्रथम संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून वंदन करण्यात आले.या कार्यक्रमात आनंद भैय्या गायकवाड, दादासाहेब गायकवाड, रावसाहेब जाधव,माजी सरपंच रामराजे गायकवाड,सेवानिवृत्त ग्रामसेवक एस.पी. गायकवाड,रंजीत पाटील, अरुण गायकवाड,सुभाष गायकवाड,बबन पुंड, एस.के.वैरागे,प्रकाश गायकवाड,प्रगती गायकवाड यांनी उपस्थीत राहून थोडक्यात मनोगत व्यक्त केले.कार्यक्रमाला जेष्ठ नागरीक,युवक, वाचक,हितचिंतक उपस्थित होते.

# गटविकास अधिकारी श्रीमती अर्पिता ठुबे यांनी महिला बचत गटाच्या महिलांना केले मार्गदर्शन



केज/प्रतिनिधी व्यवस्थापन कक्ष पंचायत समिती केजच्या वतीने विडा येथे ग्रामीण भागातील महिलांना प्रशिक्षण व खेड्यापाड्या तील होतकरू शेतकरी कुटुंबातील गोरगरिब महिलांना जास्तीत जास्त बचत गट या योजनेचा लाभ मिळण्यासाठी व जनजागृती करण्यासाठी आयएएस गटविकास अधिकारी श्रीमती अर्पिता ठुबे यांनी विडा प्रभागा तील नारीशक्ती प्रभाग संघाची बैठक प्रकल्प संचालक संगितादेवी पाटील यांच्या संकल्पने तून व जिल्हाव्यवस्थापक शकील सर यांच्या मार्ग दर्शनाने बैठक आयोजित केली याबैठकीत गट विकास अधिकारी (भाप्रसे)अर्पिता ठुबे यांनी भेट दिली असता प्रभाग संघाच्या बैठकीत saturation ,rf,cif बँक कर्ज,डिजिटलआजीविका रजिस्टर,lokosPmfme वैयक्तिक उद्योगव्यवसाय, ३५ %सबसिडी इत्यादी कामाचा आढावा व मार्गदर्शन केले व वसुंधरा उत्पादन गटाला भेट दिली कामकाज कशा पद्धतीने चालते यांची माहिती घेऊन मार्गदर्शन केले त्यानंतर विविध व्यवसायाची पाहणी केली व महिलांचे कौतुक करून महिलांना प्रोत्साहन दिले या बैठकीसाठी येवता गावचे सरपंच,BMM ओव्हाळ मॅडम,सर्व BM, सर्व CC सर्व गावातील कॅडर,सर्व गावातील ग्राम संघाचे पदाधिकारी हजर होते.

# आष्टी येथील बी व एम फार्मसी कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी विद्यापीठ आविष्कार 24 मध्ये मिळवला द्वितीय क्रमांक

आष्टी - (प्रतिनिधी) आष्टी येथील आनंद चॅरिटेबल संस्था संचलित कॉलेज ऑफ फार्मासुटिकल सायन्स अँड रिसर्च, आष्टी (डी फार्मसी, बी फार्मसी, एम फार्मसी कॉलेज) या कॉलेजमधील विद्यार्थ्यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर या ठिकाणी आयोजित झालेल्या विद्यापीठ आविष्कार २०२४ मध्ये द्वितीय क्रमांक मिळवला आहे.

आविष्कार हा एक संशोधन महोत्सव आणि स्पर्धा आहे जी विद्यार्थ्यांना त्यांच्या कल्पना, नवकल्पना




आणि कौशल्ये सादर करण्यासाठी प्रोत्साहित करते, नवीन औषधी क्षेत्रामधील संशोधनचा अभ्यास केला जातो व नवीन प्रकारचे जे काही संशोधन आहे त्याला पारितोषिक दिले जाते, हा आविष्कार कार्यक्रम स्पर्धेच्या स्वरूपात सुरुवातीला विद्यापीठ अंतर्गत असलेल्या सर्व महाविद्यालयांचा मिळून जिल्हा पातळीवर प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी घेतला जातो, तो १० ऑक्टोबर २०२४ रोजी जिल्ह्याच्या ठिकाणी घेण्यात आला, यामध्ये आष्टीच्या फार्मसी कॉलेज मधील बी. फार्मसी शाखेतील विद्यार्थ्यांनी प्रथम व द्वितीय क्रमांक मिळवला होता त्यामध्ये प्रथम क्रमांक कु. लगड राजनंदिनी, कुदळे श्रद्धा व द्वितीय क्रमांक कुमारी भोज साक्षी व झगडे स्नेहल तसेच एम फार्मसी शाखेतील प्रथम क्रमांक कुमारी खोसे ऐश्वर्या व यादव प्रतीक यांनी मिळवला होता. यानंतर विविध जिल्ह्यांमधून निवडलेल्या प्रथम द्वितीय व तृतीय क्रमांक विद्यार्थ्यांचे अंतिम स्पर्धा ही विद्यापीठ ठिकाणी होत असते त्यानुसार १४ व १५ डिसेंबर २०२४ या रोजी अंतिम स्पर्धा विद्यापीठ, छत्रपती संभाजी नगर या ठिकाणी झाली, या ठिकाणी या कॉलेजच्या विद्यार्थिनींनी कुमारी लगड राजनंदिनी व कुदळे श्रद्धा यांनी द्वितीय क्रमांक पारितोषिक मिळवले हे पारितोषिक डॉ. सी डी लोखंडे संशोधक संचालक व प्रमुख डी वाय पाटील विद्यापीठ, कोल्हापूर , डॉ.ए के राव संचालक, प्रमुख सीआयपीईटी स्किल विभाग छ.संभाजीनगर, तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. विजय फुलारी , डॉ. वाल्मीक सरवदे प्र. कुलगुरू, डॉ. प्रशांत अमृतकर कुलसचिव, डॉ.भास्कर साठे विद्यापीठ अविष्कार आयोजक, डॉ. कैलास अंभुरे संचालक विद्यार्थी विकास मंडळ या सर्वांच्या उपस्थितीत व हस्ते देण्यात आले. पारितोषिक मिळवलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मा. आ .भीमरावजी धोंडे , सहसचिव डॉ.अजयदादा धोंडे, संचालक अभयराजे धोंडे व प्रशासन अधिकारी डॉ. डी. बी. राऊत , शिवदास विधाते , माऊली बोडखे , संजय शेंडे यानी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या सर्व विद्यार्थ्यांना कॉलेजच्या सह प्राध्यापिका श्रीमती अत्तार टी टी यांचे मार्गदर्शन मिळाले , या कॉलेजचे विद्यार्थी नेहमी विविध क्षेत्रांमध्ये यश संपादन करत असतात, विद्यार्थ्यांना या कॉलेजमधून वेगवेगळ्या विषयावर मार्गदर्शन केले जाते असे कॉलेजचे प्राचार्य डॉ. सुनील कोल्हे यांनी सांगितले.

# स्व. सरपंच संतोष देशमुख यांच्या मारेकऱ्यांना फाशी द्या!



शिरूर/प्रतिनिधी जिल्ह्यातील केज तालुक्यातील मस्साजोग येथील हत्याकांड प्रकरणी राज्य ढवळून निघाले असून संपूर्ण अधिवेशन या हत्याकांड भोवती फिरले आहे. यातील आरोपी काही अटक असून काही आरोपी फरार आहेत . दिवसाढवळ्या एका सरपंच लोकप्रतिनिधीचे अपहरण करून अमानुषपणे मारहाण करून ऋदय द्रावक घटना घडली असून सरपंचाला हालहाल करून खून करण्यात आला. याचे पडसाद उमटले आहेत असून शहरात या प्रकरणाच्या निषेधार्थ स्व. सरपंच संतोष देशमुख यांच्या मारेकऱ्यांना फाशी द्या व यांच्या मास्टर माईड ला अटक करून खुनाचा गुन्हा नोंद करण्यात यावा अशी मागणी करत शहरातील जिजामाता चौक ते छत्रपती संभाजी महाराज चौकापर्यंत सर्व समाज बांधवांनी शुक्रवारी (दि.20) काढला कँडल मार्च काढण्यात आला. छत्रपती संभाजी महाराज चौकात स्व. देशमुख यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यावेळी महिला पुरुष व मुले यांची उपस्थिती होती. यात हजारो बांधवांनी सहभाग घेतला .

# आपण लवकरच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,ना.पंकजाताई मुंडे, ना.धनंजय मुंडे यांचा आष्टीत भव्य सत्कार करणार

## पराभवाने खचून जावू नका, संघर्ष करीत करीत राजकारण करतच राहणार - माजी आ. भीमराव धोंडे




आष्टी - (प्रतिनिधी) राज्यात महायुतीचे सरकार सत्तारुढ झाले आहे. बीड जिल्ह्यातून कॅबिनेट मंत्रीपदी ना. पंकजाताई मुंडे व ना. धनंजय मुंडे यांना संधी मिळाली आहे. त्यांचा कोणी सत्कार केला नसला तरी आपण आष्टीत लवकरच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची तारीख घेऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, ना. पंकजाताई मुंडे, ना. धनंजय मुंडे यांचा लवकरच भव्य सत्कार करु, कार्यकर्त्यांनी पराभवाने खचून जावू नये, निवडणुकीत जय पराजय होतच असतो. मी राजकारण सोडणार नाही. लोकांसाठी राजकारण करीतच राहणार आहे. पराभवाने खचून जावू नका, संघर्ष करीत करीत राजकारण करतच राहणार असे माजी आ. भीमराव धोंडे यांनी आष्टी येथे आयोजित कार्यकर्ता चिंतन बैठकीत बोलताना केले. माजी आ. भीमराव धोंडे यांनी लोकाग्रहास्तव अपक्ष निवडणूक लढवली परंतु पराभवास सामोरे जावे लागले. आष्टी कार्यकर्ता चिंतन बैठकीच्या अध्यक्षस्थानी माजी आ. भीमराव धोंडे हे होते. याप्रसंगी व्यासपीठावर युवा नेते अजयदादा धोंडे, जेष्ठ नेते लालाभाऊ कुमकर, माजी जि. प. सदस्य रामराव खेडकर, रामदास बडे, दशरथदादा वनवे, ॲड. रत्नदिप निकाळजे, रिपाइंचे तालुकाध्यक्ष अशोक साळवे, उपसभापती पांडुरंग नागरगोजे, माजी सभापती सौ. सुवर्णाताई लांबरूड, जि. प. सदस्य सुरेश माळी, महाराष्ट्र केसरी सईद चाऊस, अशोक दहिफळे, सरपंच दादासाहेब जगताप, माऊली पानसंबळ, हरिभाऊ जंजिरे, माजी सभापती नियामत बेग, माजी सरपंच बबनराव औटे, पोपटराव सिरसाट, ॲड. मोहन खेडकर, ॲड. संभाजी दहातोंडे, देवीदास शेंडगे, महारूद्र खेडकर, राजपल शेंडगे, विठ्ठलराव बन्सोडे, हरिभाऊ जंजीरे, यासीनभाई शेख, माऊली पानसंबळ, अस्लम बेग, अस्ताक शेख, छगन तरटे, दिलीप काळे, अंकुश मुंडे, दादा जगताप, बाबु कदम, दादा विधाते, बाळासाहेब शिंदे, आदिनाथ गवळी, संजय मिसाळ, विष्णू दहिफळे, बाबा गर्जे, कृष्णा गोल्हार, गौतम सावंत, शेख अन्सारभाई, युवराज खटके, रघुनाथ शिंदे, बबन सांगळे, सदा पाटील दिंडे, राजेंद्र खाडे, एकनाथ सानप,अभय गर्जे, श्रीराम गर्जे आदि मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी मस्साजोग येथील सरपंच कै. संतोष देशमुख व परभणी येथील कै. सोमनाथ सुर्यवंशी यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. पुढे बोलताना माजी आ. भीमराव धोंडे यांनी सांगितले की, विधानसभा निवडणुकीत सर्वांनीच खुप कष्ट घेतले परंतु आपल्या कष्टाचे चीज झाले नाही. मला ना. पंकजाताई मुंडे व इतर काही मित्रांनी सांगितले होते की, अपक्ष लढणे अवघड आहे. पण लोकांच्या आग्रहामुळे रिंगणात उतरलो. पण आजच्या काळात अपक्ष लढविणे सोपे नाही. शासनाने शेतकऱ्यांसाठी जाहीर केलेली मोफत विज पुरवठा योजना, लाडकी बहीण योजना यामुळे मतदान फिरले असावे तसेच ईव्हिएम मशिनचाही संशय आहे. राज्यातील १०० मतदार संघात पराभुत उमेदवारांनी ईव्हीएम विरोधात तक्रार केली आहे. निवडणूक प्रक्रीयेत सुधारणा होणे आवश्यक आहे. भविष्यात ते होईल. पुढच्या विधानसभा निवडणुकीच्या वेळी हा मतदारसंघ महिलांसाठी राखीव महिला होऊ शकतो. शेतकरी जसा शेवट पर्यंत शेती करतो तसे आपण देखील शेवटपर्यंत राजकारण करू तसेच सरकारच्या माध्यमातून लोकांचे वैयक्तिक व सार्वजनिक प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न करु. ना. पंकजाताई मुंडे यांच्या दोन सभा झाल्या नसत्या तर माझा विजय झाला असता.आपण आरक्षण मुद्यावर वादग्रस्त ठरलो नाही. सर्व जाती धर्माच्या लोकांना सोबत घेऊन काम केले तसे संस्कार माझ्यावर आहेत. नागपूर येथे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेऊन दौलावडगाव ते लिंबादेवी हा रस्ता का◌ॅ◌ंक्रिट करण्याची मागणी निवेदनाद्वारे केली. तसे पत्र त्यांना दिले आहे.

# दिनदर्शिके कडे सकारात्मक संधी म्हणून विधिज्ञानी पहावे - न्यायमूर्ती शिवकुमार डिगे



**लातूर राजयोग प्रतिनिधी**

**दि.२० डिसेंबर २०२४ रोजी लातूर जिल्हा वकील मंडळाच्या वतीने दिनदर्शिका विमोचन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.**

**न्यायमूर्ती शिवकुमार डिगे यांच्या शुभहस्ते लातूर जिल्हा वकील मंडळ लातूर च्या दिनदर्शिकेचे विमोचन करण्यात आले. यावेळी दीनदर्शिके कडे केवळ मुहूर्त, दिनांक, वृत्त्वैकल्ये पाहण्यासाठीच नव्हे तर सकारात्मक संधी म्हणून पहावे असे विचार व्यक्त केले.**

रोजचा प्रत्येक येणारा दिवस हा विधिज्ञा बरोबरच ,पक्षकारांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा असतो त्यामुळे वेळ न घालवता आपल्या पक्षकारास स्पिडी न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील राहावे.न्याय व्यवस्थेला सक्षम ठेवण्याचे काम विधीज्ञानी केले असल्याचे विचार यावेळी व्यक्त केले. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून अँड अण्णाराव पाटील सदस्य महाराष्ट्र व गोवा वकील परिषद मुंबई, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश श्री व्हीं व्ही पाटील, जिल्हा सरकारी अभियोक्ता संतोष देशपांडे तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अँड शरद इंगळे उपस्थित होते तर मंचावर उपाध्यक्ष अँड मनीषा दिवे पाटील, सचिव अँड प्रदिपसिंह गंगणे, सहसचिव अँड नरेश कुलकर्णी,अँड तृप्ती इटकरी ग्रंथालय सचिव अँड विजय साबळे आदी उपस्थित होते यावेळी अँड अण्णाराव पाटील, प्रमुख जिल्हा न्यायाधीश व्हि व्हि पाटील यांनी दिनदर्शिका विमोचन कार्यक्रमास शुभेच्छा व्यक्त केल्या.

या कार्यक्रमास लातूर जिल्हा वकील मंडळातील ज्येष्ठ विधीज्ञ माधवराव इंगळे, अँड व्यकटराव बेंद्रे, अँड पुरुषोत्तम नावंदर, अँड उदय गवारे, अँड विवेक वावरे, अँड विजय जाधव, अँड जयश्रीताई पाटील, अँड मेघा पाटणकर, अँड हर्षला जोशी,अँड शिल्पा शहादपुरी, अँड स्वाती केंद्रे, अँड अभिलाषा गवारे आदींसह मोठया संख्येने उपस्थिती होती

कार्यक्रमांचे सूत्रसंचालन अँड रोहित सोमवंशी यांनी केले तर प्रास्ताविक,आभार अँड नरेश कुलकर्णी यांनी मांडले आहे.



# लाईनमन शिंदे यांचा मुलगा युवराज झाला पोलीस उपनिरीक्षक

शिरूर कासार / मनोज परदेशी

शिरूर कासार तालुक्यातील आर्वी येथील लाईनमन भाऊसाहेब शिंदे यांच्या मुलाने महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगाची परीक्षा देऊन उत्तीर्ण होऊन पोलीस उपनिरीक्षक होण्याचा मान मिळवला आहे. भाऊसाहेब शिंदे यांचा मुलगा युवराज शिंदे याने मन लावून महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगाची तयारी केली व यश मिळवले, आभास करत असताना अभ्यासात सातत्य ठेवत अभ्यासाच्या बळावर तालुक्यातील आर्वी गावात पहिला पोलिस उपनिरीक्षक होण्याचा मान मिळविला.त्यांच्या यशा बद्दल आर्वी येथील सेवानिवृत्त मुख्यअभियंता दिगंबर मळेकर साहेब यांनी त्याचा सत्कार करून त्यांना भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळात लाईनमन म्हणून नोकरीस करत असलेले भाऊसाहेब शिंदे यांचा मुलगा युवराज शिंदे यांनी वडिलांचे स्वप्न प्रत्यक्षात पूर्ण करून दाखवले आहे.याबद्दल सेवानिवृत्त मुख्य अभियंता दिगंबर मळेकर यांनी युवराज शिंदे याचा सत्कार केला. युवराजने अभ्यास करून पोलिस उपनिरीक्षक होण्याचा मान मिळविलेला हा मान आर्वी आणि परिसरातील सर्वांच्यासाठी अभिमानाची बाब असल्याचे दिगंबर मळेकर यावेळी म्हणाले.याप्रसंगी माजी सरपंच भास्कर घरगिने, सामाजिक कार्यकर्ते शेराव आरेकर,डी.पी.घरगिने,बापू शिंदे, जीवन पोकळे,भारत घरगिने, अशोक सुस्कर,रवी कदम, आप्पा भोकरे,लक्ष्मण देवकते,सुरेश मंडलिक,गोकुळ यादव,विष्णू सुस्कर,संकेत म्हस्के,अशिष जोगदंड,शिवाजी मळेकर,बबन शिंदे,समाधान मंडलिक,प्रताप घरगिने, सोमनाथ साळवे,शांतिनाथ मळेकर आदी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विदर्भ, मराठवाड्यासह उर्वरित महाराष्ट्राचा समतोल विकास साधणार-मुख्यमंत्री

**विदर्भ, मराठवाड्यातील सिंचन प्रकल्प, औद्योगिक प्रकल्प पूर्णत्वाला नेणार**

**गडचिरोलीतील नक्षलवाद आटोक्यात आणणार**

**विदर्भात आंतरराष्ट्रीय दर्जाचे वनपर्यटन, जलपर्यटन**

**मराठवाड्यातील वॉटरग्रीड प्रकल्प मार्गी लावणार**

**पिक विमा कंपन्यांच्या गैर प्रकारांची सखोल चौकशी**

**अडिच वर्षात हाती घेतलेली कामे प्राधान्याने पूर्णत्वाला नेण्यात येणार**

नागपूर :- विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र, कोकणातील मागास भागासह उर्वरित महाराष्ट्राचा समतोल विकास साधत महाराष्ट्रातील जनतेला न्याय देणार असल्याची ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत दिली. विदर्भ, मराठवाड्यातील सिंचन प्रकल्प, औद्योगीक प्रकल्प पूर्णत्वाला नेणार असून मराठवाड्यातील वॉटरग्रीट प्रकल्प मार्गी लावणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. गडचिरोली स्टील सिटी म्हणून उदयास येत असून येत्या तीन वर्षात गडचिरोलीतील नक्षलवाद आटोक्यात आणणार असल्याचे त्यांनी सांगितले. त्याचबरोबर पीक विमा कंपन्यांच्या गैरप्रकरांना आळा घालण्यासाठी या प्रकरणाची सखोल चौकशी करणार असल्याचे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सभागृहात स्पष्ट केले.अंतिम आठवडा प्रस्तावावरील चर्चेला उत्तर देताना मुख्यमंत्री श्री. फडणवीस विधानसभेत बोलत होते.

अलमट्टी धरणाची उंचीसध्या अलमट्टी धरणाच्या उंचीचा प्रश्न चर्चेत असून कोल्हापूर, सांगली येथील शेतकरी, सामान्य नागरिक यांची जिवित हानी, मालमत्ता नुकसान होणार नाही यासाठी राज्य सरकार योग्य ती खबरदारी घेईल, असे ते म्हणाले.

### मुंबई गोवा महामार्ग

मुंबई गोवा या महामार्गाच्या कामातील अडचणी दूर करण्यात करण्यात आल्या आहेत. युध्दपातळीवर या प्रकल्पाचे काम सुरू असून हा महामार्ग पूर्ण होईल असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला. ठाणे महापालिका विकास आराखडा संदर्भात सूचना व हरकती मागवण्यात आल्या आहेत. या सूचना हरकतींवर सुनावणी घेऊन योग्य निर्णय घेण्याचे निर्देश अधिकाऱ्यांना दिले आहेत. त्याचबरोबर संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील रहिवाशांच्या पुनर्वसनाचा प्रश्न सोडविणार आहे असे स्पष्ट करत मुख्यमंत्री म्हणाले की, गेल्या अडिच वर्षात हाती घेतलेली कामे प्राधान्याने पूर्णत्वाला नेण्यात येणार आहेत.

### पीक विमा गैरप्रकारांची सखोल चौकशी

नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकऱ्यांच्या पिकाचे नुकसान होते यातून सावरण्यासाठी शासनाने पीक विमा योजना सुरू केली. शेतकऱ्यांसाठी ही चांगली योजना आहे. या योजनेबाबत सदस्यांनी काही गंभीर मुद्दे सभागृहात उपस्थित केले आहेत. त्यामुळे बीडसह राज्यातील अन्य जिल्ह्यात या योजनेबाबत काही गैरप्रकार घडल्या संदर्भात सखोल चौकशी केली जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.





### विदर्भातील सिंचन

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, विदर्भातील सिंचनाचे क्षेत्र वाढविण्यासाठी वैनगंगा-पैनगंगा-नळगंगा नदी जोड प्रकल्प येत्या सात वर्षात मार्गी लावणार आहे. 88 हजार कोटींच्या या प्रकल्पामुळे १० लाख एकर जमिन ओलिताखाली येणार आहे. या प्रकल्पामुळे ५५० किलो मिटर लांबीची नवी नदीच तयार होणार असून यामुळे विदर्भात मुबलब पाणी उपलब्ध होणार आहे. नाग नदी सुधाराला मान्यता मिळाली आहे. नाग-पोहरा-पिवळी नदी असा प्रकल्प असून सांडपाणी या नद्यांमध्ये जाऊ नये यासाठी प्रयत्न सुरू आहेत. यामुळे औद्योगिक क्षेत्रात देखील वाढ होण्यास मदत होईल. मुबलक पाण्यामुळे विदर्भाच्या औद्योगिक विकासालाही गती मिळेल. विदर्भ, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्रातील प्रकल्पांसाठी बळीराजा योजनेमुळे सिंचन क्षेत्र वाढणार आहे. प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना सिंचन क्षेत्र वाढण्यासाठी उपयुक्त ठरत आहे. कन्हान नदी वळण योजनेला मंजूरी दिली असून 3200 एकर जमिन सिंचनाखाली येणार आहे.

### शेतकऱ्यांना मदत

अवकाळी पावसामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना जवळपास 16 हजार 219 कोटी रुपयांचा निधी देण्यात आला आहे. तर धान उत्पादक शेतकऱ्यांना प्रति हेक्टरी 20 हजार रुपये बोनस देण्यात येत असल्याचे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले. वर्धा अमरावती अकोला आणि बुलढाणा या जिल्ह्यातील ५५ हजार शेतकऱ्यांच्या संत्रा पिकांची गळती झाली होती. या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी तीन हेक्टर क्षेत्र मर्यादित प्रमाणे जवळपास १६५ कोटी रुपयांची मदत देण्यात आली असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.सोयाबीन व कापूस उत्पादकाला योग्य मदत दिली जात असून राज्यात 557 हमी भाव खरेदी केंद्रावर आतापर्यंत जवळपास 23 लाख 68 हजार 475 क्विंटल इतकी सोयाबीन खरेदी करण्यात आली आहे. मागील पंधरा वर्षाच्या तुलनेत ही मोठी खरेदी आहे. ही खरेदी केंदे 12 जानेवारीपर्यंत सुरू राहणार आहेत. मध्यप्रदेशच्या धरतीवर खरेदी व्यवस्था सुरू करण्यासंदर्भात संबंधित अधिऱ्यांना सूचना दिल्या आहेत असे मुख्यमंत्री म्हणाले.

### मराठवाडा औद्योगिक विकासाचे दालन

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, राज्यात उद्योगांना पायाभूत सुविधा उपलब्ध करून दिल्यामुळे उद्योजकांचा कल राज्याकडे वाढला असून पुण्यानंतर संभाजीनगर व जालना ही दोन मोठी औद्योगिक क्षेत्र म्हणून पुढे येत असल्याने मराठवाडा औद्योगिक विकासाचे मोठे दालन होत आहे. वंदे भारत ट्रेन लातूरच्या कोच फॅक्टरीत तयार होत असल्याने या ठिकाणी रोजगाराची मोठी संधी उपलब्ध झाली आहे. टोयोटा प्रकल्प ऑरिक सिटीमध्ये आल्याने रोजगारच्या मोठी संधी उपलब्ध झाली आहे. या ठिकाणी ऑटोमोबाईल ईको सिस्टीम व्हावी म्हणून कुशल मनुष्य बळ निर्माण होण्यासाठी प्रशिक्षण केंद्र उभारले आहे. शिरूर ते छ. संभाजी नगर हा 14 हजार 886 कोटींचा ग्रीन फिल्ड मार्ग तयार करण्यात येत आहे. मराठवाडा,विदर्भातील शेतकऱ्यांना दुग्धव्यवसाय करता यावा यासाठी मदत डेअरीची मदत घेऊन दुग्धव्यवसायाला चालना देण्यात येणार आहे.

# स्व.देशमुख हत्या प्रकरणाचा मास्टरमाईंड वाल्मीक कराडच

## कुणीही भिण्याचे कारण नाही-आ.संदीप क्षीरसागर

स्व.संतोष देशमुख यांच्या हत्त्या प्रकरणाचा मास्टरमाईंड हा वाल्मीक कराडच आहे. दोन समाजात तेढ निर्माण करण्यात आणि गुन्हेगारीचे वातावरण तयार करून दहशत निर्माण करण्याचा प्रकार केला जात आहे. त्यामुळे वाल्मीक कराड सारख्या कुप्रवृत्तीला जेरबंद केल्यास संपूर्ण जिल्ह्यात शांतता आणि सलोखा अबाधित राहील. यासोबतच स्व.संतोष देशमुख यांच्या कुटुंबाची जबाबदारी खा.शरदचंद्र पवार साहेब यांनी घेतली आहे. आम्हीही, कुटुंबासाठी गावकरी जबाबदारी देतील ती घेऊ. जोपर्यंत स्व.संतोष देशमुख यांच्या कुटुंबियांना आणि गावकऱ्यांना न्याय भेटणार नाही तोपर्यंत पूर्ण ताकदीनिशी सोबत आहोत. गावकऱ्यांना अजिबात भिण्याचे कारण नाही. असे आ.संदीप क्षीरसागर यांनी मस्साजोग येथे देशमुख कुटुंबियांची भेट घेण्याकरिता राष्ट्रीय नेते खा.शरदचंद्र पवार आले असता बोलताना सांगितले.चौकटराज्य सरकार आणि केंद्र सरकार याच्या खोलात जाईपर्यंत आम्ही स्वस्थ बसणार नाही - शरद पवार रक्कम दिली मदत होईल. पण गेलेला माणूस येत नाही. मदत दिली तरी कुटुंबाचं दुख जाणार नाही. आम्ही त्यावर टीका करत नाही. पण जोपर्यंत याच्या खोलात जाऊन चौकशी करा. सूत्रधार जे आहेत. त्याला तातडीने धडा शिकवला पाहिजे. इथल्या वकिलांनी लेखी निवेदन दिलं त्याचा आनंद आहे. इथले वकील जबाबदारी घ्यायला तयार आहे. केंद्र सरकार आणि राज्य सरकार लोकप्रतिनिधी वकील मंडळी तुमचे हितचिंतक म्हणून या प्रश्नाकडे पाहत आहे. या गावात दहशतीचे वातावरण आहे. कृपा करा दहशतीतून बाहेर पडा. आपण सर्व मिळून तोंड देऊ. एकदा सामुदायिकपणे उभं राहिल्यावर कोणी आपल्याला आडवू शकत नाही. बीडमध्ये ही गोष्ट घडतेय. ही गोष्ट बरोबर नाही. न्याय मिळाला पाहिजे. दुखात आपण सर्व आहोत. राज्य सरकार आणि केंद्र सरकार याच्या खोलात जाईपर्यंत आम्ही स्वस्थ बसणार नाही, असा इशाराही शरद पवारांनी दिला.





केज - तालुक्यातील मस्साजोग येथील येथील सरपंच स्व.संतोषअण्णा देशमुख यांच्या कुटुंबियांची राष्ट्रवादी कॉंग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार यांनी सांत्वनपर भेट घेतली. याप्रसंगी पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिकांची उपस्थिती होती.

# दिंद्रुड येथे कुठल्याही परिस्थितीत बंद पुकारण्यात येणार नाही

दिंद्रुड (प्रतिनिधी):- वेगवेगळ्या कारणांमुळे पुकारण्यात येणाऱ्या सततच्या बंदला दिंद्रूडकर व व्यापारी पुरते वैतागले आहेत. यामुळे सर्व व्यापाऱ्यांनी एकत्रित येऊन बैठक घेतली. यापुढे काहीही झाले तरी कुठल्याही परिस्थितीत बंद पुकारण्यात आला तरी आपापली दुकाने चालू ठेवण्याचा एकमुखी निर्णय सर्वानुमते घेण्यात आला. माजलगाव तालुक्यातील दिंद्रूड ही सर्वात मोठी बाजारपेठ आहे. व्यावसायिक दृष्ट्या अतिशय झपाट्याने वाढत असलेल्या मार्केटला बाहेरील व्यापारीवर्ग व्यापारासाठी पहिली पसंती देतात. भुसार, कृषी उत्पादने, बांधकाम साहित्या पासून ते सोन्याचांदीची खरेदी - विक्री मोठ्या प्रमाणात होत असल्यामुळे दररोज लाखोंची उलाढाल होते. इथला शेकडो वर्षांपासून भरणारा आठवडी बाजार पंचक्रोशीत लोकप्रिय आहे. मागच्या काही वर्षांपासून कोणत्या ना कोणत्या कारणाने सतत होणाऱ्या बंद मुळे व्यापारी वर्गाला अनेक अडचणीला तोंड द्यावे लागत आहे. यालाच वैतागलेल्या दिंद्रुड येथील सर्व व्यापाऱ्यांनी येथील शिवाजीनगर भागात शनिवारी सकाळी बैठकीचे आयोजन केले होते. या बैठकीत यापुढे कुठल्याही परिस्थितीत बंद पाळण्यात येणार नसल्याचा ठराव सर्वानुमते पास करण्यात आला. येथील प्रतिष्ठित नागरिक युवराज ठोंबरे, बंडूजी खांडेकर, प्रदीप ठोंबरे, संतोष स्वामी, पत्रकार संघाचे अध्यक्ष अमोल ठोंबरे यांच्या प्रमुख उपस्थितीत व्यापारी महासंघाची स्थापना करण्यात आली. संघाच्या पदाधिकाऱ्यांची यादी यावेळी सर्वानुमते जाहीर करण्यात आली. व्यापाऱ्यांच्या अडीअडचणी सोडवण्यासाठी व्यापारी महासंघ दिंद्रुड ही संघटना काम करणार आहे. व्यापारी महासंघाचे अध्यक्षपदी उद्योजक प्रकाश ठोंबरे, उपाध्यक्ष गणेश मायकर व परमेश्वर ठोंबरे, सचिव गणेश काटकर, कोषाध्यक्ष पांडुरंग झोडगे, सहसचिव संजय बडे, सदस्य पदी पद्माकर मुंडे, शहाजी काशीद, सय्यद शायक, सुरेश पासंगे, महेश ठोंबरे, मुन्ना ठोंबरे यांची एक मुखाने निवड करण्यात आली. यावेळी शेकडो व्यापारी उपस्थित होते.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

# जिल्हा परिषद शाळेला दुपारीच कुलूप काम चुकार शिक्षकांना निलंबित करा:प्रकाश उजगरे

**बीड ।प्रतिनिधी**

**गोरगरिबांचा शिक्षणाचा मुख्य स्त्रोत असलेल्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कुठल्या ना कुठल्या कारणावरून वारंवार चर्चेत असतात, महाराष्ट्र मधील जिल्हा परिषद शाळांची दुर्दैवी अवस्था होताना आपल्याला पाहायला मिळत आहे.**




त्यातच बीड जिल्ह्यामधील वडवणी तालुक्यामध्ये मौजे मोरवड येथील वस्ती शाळा इस्लामपूर येथे रोज शाळेचा दरवाजा दुपारीच बंद करण्याचा नित्यक्रम पाहायला मिळत आहे, तेथील नागरिक तसेच गावचे सरपंच यांच्यामार्फत वारंवार शिक्षकांना सूचना देण्यात येत असतात की आपण शाळेत आलं पाहिजे विद्यार्थ्यांकडे लक्ष दिलं पाहिजे परंतु तेथे असलेले दोन शिक्षक मुख्याध्यापक आबासाहेब आंधळे हे तालुक्याच्या ऑफिस ला काम आहे असे कारण सांगत असतात, आबासाहेब आंधळे व त्यांच्या सहकारी शिक्षिका मिरा गायकवाड मॅडम बारी बारीने आज मी येतो उद्या तुम्ही या ही मानसिकता घेऊन शाळेमध्ये येतात, जिल्हा परिषदेच्या शिक्षणाचा दर्जा शिक्षकांमुळेच घसरला जातोय हे अशा प्रकरणांमधून आपल्याला पाहायला मिळत आहे, इस्लामपूर वस्ती येथे दोन शिक्षक आहेत एका दिवशीही एकत्र शाळेत आले असे पाहायला मिळत नाही हे कोणाच्या आश्रयाने चालत आहे याचा कुठेतरी तपास झाला पाहिजे चौकशी झाली पाहिजे, व अशा कामचूकार शिक्षकांना निलंबित केलं पाहिजे असे पत्रकार यांच्याशी बोलताना विद्यार्थ्यांचे नेते प्रकाश उजगरे यांनी सांगितले जिल्हा परिषद शाळा टिकल्या तर गोर गरिबांची मुले शिकतील अन्यथा शिक्षणा पासून वंचित राहतील हे कुठेतरी थांबलाच पाहिजे.



अंतरवन पिंपरी येथील रस्त्याच्या उद्घाटन प्रसंगी सरपंच उपसरपंच आणि ग्रामस्थ मंडळी



मराठा संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांचे आष्टी येथे आगमन झाल्यानंतर त्यांचे स्वागत करताना आष्टी शिरूर पाटोदा विधानसभा मतदारसंघाचे युवा नेते जयदत्त भैय्या धस व कार्यकर्ते यांनी त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले यावेळी सर्व जाती जमाती कार्यकर्ते उपस्थित होते छाया :(सुरेश कांबळे आष्टी )

# च-हाटा रोडवरील पालवण फाट्यावरील रेल्वे पुल पाडण्याचे काम सुरु

## जनतेचे २ कोटी ७० लाख रुपयांचा चुराडा ; जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करा :- डॉ.गणेश ढवळे

बीड ।प्रतिनिधी

अहिल्यानगर -बीड- परळी या रेल्वेचे स्वप्न बीडकरांनी गेल्या अनेक वर्षांपासून जागवले आहे. अनेक घडामोडी मागच्या काळात झाल्या.मात्र रेल्वे कधी येणार याबाबत काहीच सांगता येत नव्हते मात्र गेल्या ५ वर्षांमध्ये रेल्वेच्या कामाला प्रचंड गती मिळाली असुन बीड जिल्हावासियांचे रेल्वेचे स्वप्न पूर्ण २०२५ अखेरीस पुर्ण होण्याची चिन्हे दिसत आहेत.




अहिल्यानगर- बीड-परळी रेल्वेमार्गाची अंमळनेर ते विघनवाडी अशी ३३.१२ किलोमीटरची चाचणी ९ आगस्ट २०२४ रोजी पुर्ण झाल्यानंतर आता शिरूर तालुक्यातील विघनवाडी ते बीड अशा ३५ किलोमीटर अंतरापैकी २२ किमीचे नवगण राजुरी गावापर्यंत रेल्वेचे रूळ अंथरण्याचे काम पूर्ण झाले आहे.डिसेंबर २०२४ अखेर रेल्वेची चाचणी होणार आहे.पुढच्या टप्प्यातील नवगण राजुरी ते बीड अशा १३ किलोमीटर अंतरात रेल्वे रूळ अंथरण्याचे काम सध्या प्रगती पथावर असुन जानेवारी २०२५ च्या शेवटच्या आठवड्यात या मार्गावरील सुरक्षेची चाचणी घेण्यात येणार आहे. मात्र बीड तालुक्यातील च-हाटा रोडवरील पालवण फाट्यावरील ८-९ वर्षांपूर्वी तब्बल २ कोटी ७० लाख रुपये खर्चून बांधण्यात आलेल्या रेल्वे पुलाचे सध्या क्रासमॅच होत असुन सरळ रेषेत नसल्याने हा रेल्वेपुल पाडण्याचे सध्या काम सुरू असुन जनतेच्या करातुन तब्बल २ कोटी ७० लाठ रूपये बांधण्यात आलेल्या रेल्वे पुल पाडण्याचे काम सुरू असुन संबंधित प्रकरणात जबाबदार अभियंता व ईतर आधिका-यांवर कारवाई करण्यात येऊन त्यांच्या कडुन नुकसान भरपाई घेण्यात यावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर,शेख युनुस च-हाटकर ,सुदाम तांदळे व शिवशर्मा शेलार यांनी जिल्हाधिकारी बीड यांना केली आहे.

# बीड जिल्ह्यातील वाढत्या गुन्हेगारीला, भ्रष्टाचाराला आणि बेरोजगारीला

## राजकारणी लोक जबाबदार आहेत : ज्ञानेश्वर कवठेकर

**बीड (प्रतिनिधी)**

बीड जिल्ह्यात मागील काही महिन्यापासून ज्या काही घटना घडत आहेत त्या घटना पूर्वी युपी बिहार या राज्यांमध्ये राजकारणासाठी घडत होत्या त्याच पद्धतीच्या घटना आज घडीला पुरोगामी असलेल्या बीड जिल्ह्यामध्ये राजकीय नेते मंडळी घडवून आणत आहेत बीड जिल्ह्यातील सर्वच राजकीय पक्षातील नेत्यांकडून जिल्ह्यात गुंडाराज सुरू आहे बीड जिल्ह्यात घडणाऱ्या प्रत्येक राजकीय अराजकीय घटनेला हे नेतेमंडळी जातीय रंग देऊन बीड जिल्ह्यातील सामाजिक विन बिघडवण्याचं काम करत आहेत राजकीय नेते मंडळीचा प्रमुख उद्देश हा असला पाहिजे की आपापल्या मतदारसंघातील लोकांची सेवा करणे, मतदारसंघामध्ये कल्याणकारी योजना राबवणे, आपल्या जिल्ह्याला व राज्याला प्रगतीच्या दिशेने घेऊन जाणे हाच उद्देश सर्व पक्षातील राजकीय नेते मंडळीकडे असायला हवा. बीड जिल्ह्याच्या राजकारणामध्ये आज घडीला वेगळे पायंडे पडताना दिसत आहेत ज्यावेळी राजकारणातील मूल्ये

संपतात त्यावेळेस राजकीय नेते मंडळी गुंडगिरी करणाऱ्या लोकांचा वापर करतात बीड जिल्ह्यातील एकही मोठा नेता आमदार खासदार मंत्री जिल्ह्याच्या विकासाकडे लक्ष देत नाही किंवा विकासात्मक दृष्टीने चर्चा करत नाही यामुळे जिल्ह्यात सुशिक्षित बेरोजगारांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे हाताला काम नसल्यामुळे जिल्ह्यातील तरुण पिढी ही गुन्हेगारी क्षेत्राकडे वळत आहे जिल्ह्यात एकही मोठा प्रकल्प नाही जिल्ह्यातील तरुणांच्या हाताला काम नसल्यामुळे हे तरुण गुन्हेगारी क्षेत्रामध्ये कार्यरत आहेत आज जिल्ह्यात छोट्या छोट्या कारणांमुळे खून मारामाऱ्या अपहरणासारखे गंभीर गुन्हे घडवून आणले जात आहेत बीड जिल्ह्यातील जनता भयभीत वातावरणात जीवन जगत आहे जिल्ह्यात कधी काय होईल याचा नेम नाही जिल्ह्यातील सामाजिक व राजकीय वातावरण गढूळ झाले आहे जे येणाऱ्या पुढील पिढी साठी धोकादायक आहे जाती धर्माचा नावावर सग्या सोयऱ्यांचे मुदे पाडले जात आहेत बीड जिल्ह्याच्या राजकारणातून संवेदनशीलता व सुसंस्कृतपणा कमी झाला आहे

वैयक्तिक झालेल्या वादालाही जातीचे रंग दिले जात आहेत पुरोगामी असलेल्या आपल्या जिल्ह्याला राजकीय नेते मंडळी जाणीवपूर्वक जाती धर्माच्या नावावर धगधगीत करून ठेवत आहेत यामुळेच बीड जिल्ह्यात गुन्हेगारी भ्रष्टाचार व बेरोजगारीपणा वाढला आहे याला जबाबदार सर्वच पक्षातील राजकीय नेते मंडळी आहेत



पाटोदा येथे छत्रपती शिवाजी महाराज चौक संघर्ष योद्धा मनोज जारंगे पाटील यांची सदिच्छा भेट झाली या प्रसंगी जरांगे पाटील यांचा सत्कार करताना प्रथम नगराध्यक्ष बळीराम पोटे, पाटोदा युवा पत्रकार जितेंद्र भोसले सर्व उपस्थित...




# बार्टी कडून संत गाडगेबाबा महाराज स्मृतिदिनी अभिवादन.

**वसमत (प्रतिनिधी)**

महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था बार्टी पुणे हिंगोली जिल्ह्याचे सहाय्यक आयुक्त समाज कल्याण यादव गायकवाड ,सिद्धार्थ गोंवदे मार्गदर्शनाखाली समतादूत मिलिंद आळणे,गुरुनाथ गाडेकर .अध्यक्षस्थानी मरीबा मोरे हे होते. प्रमुख पाहुणे मिलिंद आळणे गुरुनाथ गाडेकर हे होते सर्वप्रथम संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले . संत गाडगेबाबा यांची ६८वी पुण्यतिथी आहे. समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा, अनिष्ट रूढी-परंपरा दूर करण्यासाठी त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य समर्पित केले. गाडगेबाबा हे कीर्तनकार, संत आणि समाजसुधारक म्हणून ओळखले जातात. त्यांचे पूर्ण नाव डेबूजी झिंगराजी जानोरकर होते, आणि त्यांचा जन्म २३ फेब्रुवारी १८७६ रोजी अमरावती जिल्ह्यातील शेणगाव येथे झाला होता.

गाडगेबाबांनी आपल्या कीर्तनांच्या माध्यमातून समाजप्रबोधन केले. ते स्वच्छतेचे महत्त्व पटवून




देत, अंधश्रद्धा निर्मूलनासाठी कार्यरत होते. त्यांच्या कीर्तनशैलीत परखड बोली आणि स्वच्छतेचा संदेश होता. १४ नोव्हेंबर १९५६ रोजी पंढरपूर येथे त्यांचे अखेरचे कीर्तन झाले, आणि २० डिसेंबर १९५६ रोजी पेढी नदीच्या काठावर वलगाव (अमरावती) येथे त्यांचे निधन झाले. यावेळी मिलिंद आळणे ,गुरुनाथ गाडेकर यांनी मनोगत व्यक्त केले. आभार प्रदर्शन संतोष पारखे यांनी केले.मरिबा मोरे, ग्यानोजी हरबाळे गौरव कोचार ,प्रणव आळणे, जयशिल मेंढे, जनराज इंगोले,सचिन आदी मोठया संख्येने नागरिक उपस्थित होत्या.

# शिरीषभाऊ देशमुख गोरठेकर यांच्या वाढदिवसानिमित्त शाळेत पेन,वही,बिस्किट देऊन उत्साहात साजरा

**उमरी (प्रतिनिधी)**

उमरी:- नायगाव विधानसभा मतदारसंघातील लोकप्रिय युवा नेते मा.सभापती मा.शिरिषभाऊ देशमुख गोरठेकर यांच्या वाढदिवसानिमित्त जि.प.शाळा क्रांती इंग्लिश स्कुल, विद्यार्थ्यांना पेन,वही, बिस्किट पेन्सिल देऊन हा उपक्रम राबविण्यात आला आहे.सदर,शिरीषभाऊ देशमुख गेल्या अनेक वर्षापासून सामाजिक बांधिलकी जपत दलित,पददलित, उद्योग,राजकीय शेत्रासह उपेक्षित आणि वंचित घटकांवर होणाऱ्या अन्याय आणि अत्याचारांच्या विरोधात खंबीरपणे उभे राहून सामान्य माणसाला न्याय हक्कासाठी खंबीरपणे त्यांच्या पाठीमागे उभे टाकून प्रत्येक समाजाच्या उत्थानासाठी आणि सामान्य माणसाच्या कल्याणासाठी आपल आयुष्य झिजविणारे उमरी पं.स.सभापती शिरीषभाऊ देशमुख गोरठेकर हे विविध क्षेत्रात आज परिचित होत आहे. थोड्या कालावधीतच विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम नांदेड जिल्ह्यासह नायगाव मतदार संघात त्यांनी केला असून प्रत्येक गावातील अनेकांच्या समस्यांना वाचा फोडण्याचे काम शिरीषभाऊ देशमुख यांच्या माध्यमातून सतत होताना दिसत आहेत.शिरीषभाऊ यांनी आपले महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण करून आता ते राजकीय,कृषीउद्योग क्षेत्रात आपले नवे आयाम शोधतांना आम्ही त्यांच्याकडे पाहतो आहोत.प्रत्येक समाजातील गोरगरीबांच्या एका हाकेला धाऊन जाणे मदत करणे,लोकांसाठी तळमळ, कळकळ असणारा, सामान्य माणसाला हवाहवासा वाटणारा हा गोरगरीबांचे कैवारी हे नेहमीच रंजल्या गांजल्या आणि सामान्य माणसाच्या भल्यासाठी आणि ज्याच्या पाठिमागे कोणीच नाही अशांच्या पाठीमागे उभा राहून मी तुमच्यासोबत आहे.ही जाणीव देणारा हा सामान्य माणसाला आपला वाटत आलेला आहे. सामान्य माणसाच्या आणि तळागाळातील समाजाच्या ज्या काही समस्या




असतील त्या समस्या जाणून घेऊन अगदी निष्ठापूर्वक त्या समस्या सोडविण्यासाठी त्यांचा पाठपुरावा अत्यंत महत्त्वाचा आणि मोलाचा वाटत आला आहे. खरंतर सामाजिक क्षेत्र हे उपेक्षित माणसाला त्याच्या समस्यांना सुद्धा न्याय मिळवून देणारे आहेत.

शिरीषभाऊ गोरठेकर हे सामाजिक बांधिलकी जपणारे दृष्टे जनतेचे सेवक असून मराठा आरक्षण सह प्रत्येक समाजाच्या अनेक प्रश्नासाठी ही ते सातत्याने आग्रही राहत आले आहेत.राजकीय क्षेत्रात मध्ये काम करत असताना समाजाच्या प्रबोधनासाठी,परिवर्तनासाठी,मराठा आरक्षण,समाजातील उच्च शिक्षणाच्या प्रसारणासाठी आनंदराव सलगरे यांनी नेहमीच आपले योगदान दिले आहे. आज पर्यंतच्या त्यांच्या कार्य आणि कर्तृत्वाची दखल घेऊन त्यांना अत्यंत सन्मानाचे पुरस्कारही मिळाले आहेत.यावेळी,मोहन राजाराम पांचाळ संचालक, योगिता मोहन पांचाळ मुख्याध्यापिका,सुभाष सिदेवाड सर

मनिषा गलांडे मॅडमलरापतवार मॅडम राधिका पांचाळ मॅडम, पत्रकार उद्धव मामडे भगवान सिदेवाड, उमेश डोकळे,साईप्रसाद जगताप ज्ञानेश्वर मामडे,रूकमाजी अंबिरे,रविकांत डोकळे,साईप्रसाद मामडे,ऋषिकेश बारोळे,साईनाथ गंगाधर बळवंते, ऋषिकेश मामडे, सोनबा गाडगे,शिवाजी बारोळे यांच्यासह गावातील प्रतिष्ठित नागरिकांसह अनेकजण उपस्थित होते.सूत्रसंचालन साईप्रसाद जगताप यांनी केला आहे.